● सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सौर ऊर्जेच्या प्रकल्प कोणत्या योजनेतून मंजूर करून आणला ते सांगावे

### आ. खोतकरांचा श्रेयवादावरून टोला ; काझी कब्रस्तानच्या विकासकामांचे लोकार्पण





**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात सौर ऊर्जा प्रकल्प मी मंजूर करून आणला आणि हे बागडबिल्ले म्हणतात आम्ही आणला नाव न घेता अर्जुन खोतकर यांनी रावसाहेब दानवे आणि कैलास गोरंट्याल यांच्यावर यावेळी टीका केली. तसेच श्रेय घेणाऱ्यांनी सौर ऊर्जा प्रकल्प कोणत्या योजनेतून मंजुर करून आणला हे सांगावे असे आवाहनही त्यांनी केले. आ.अर्जूनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर २० कोटी रू.च्या विकास कामांतील जालना शहर म हानगरपालिका हद्दित झालेल्या काझी कब्रस्तान लक्कडकोट येथे संरक्षण भिंत व गट्टू रोड च्या कामासाठी अंदाजीत चाळीस लाख रु. च्या कामाचे लोकार्पण सोहळा रविवार (दि १६) रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास आमदार अर्जूनराव खोतकर यांच्या हस्ते पार पडला यावेळी ते बोलत होते.

यावेळी फिरोजलाला तांबोली, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, जावेद, जाफर खान, सगीर, अ‍ॅड. अशपाक, मुसा परसुवाले, बाबा कुरेशी, राजेक कुरेशी, शेख फेरोज, जहीर काझी, जाफर काझी, गुड्डू काजी, इमरान एमडी नासिर काझी, असलम बेग, शेख बशीर, जावेद सिद्दिकी, अकबर शहा, शेख मज्जू, ताहेर भाई, बडे खान, बिलाल सौदागर, बाळू बनसोडे यांच्यासहित परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना आ. खोतकर म्हणाले, जालना महापालिकेसाठी ९५ कोटी रुपयांचा सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर करण्यात आला. त्यामुळे महापालिकेचे महिनाकाठी चार ते पाच कोटी रुपये वाचणार आहेत. सौर ऊर्जेच्या प्रकल्प आपण कोणत्या योजनेतून मंजूर करून आणला आहे, आपल्यालाच माहीत आहे जे लोक श्रेय घेण्यासाठी चढाओढ करत आहेत, त्यांनी राजूरच्या गणपतीवर हात ठेवावा नसता आपण हात ठेवण्यास तयार आहोत. या प्रकलपावरून सध्या श्रेय वाद सुरु असून रावसाहेब दानवे आणि कैलास गोरंट्याल यांनीही हा प्रकल्प आम्ही मंजूर करून आणल्याचा दावा केला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी आमदार अर्जुन खोतकर यांनी काझी कब्रस्तान साठी निधी देण्याचा शब्द दिला होता. त्यानंतर निधी देऊन शब्द पूर्ण करून ४० लाखाचा निधी दिला. त्या कामातून काझी कब्रस्तान हे सुसज्ज वृक्षरोपण, पाणी इत्यादी बाबतीत पूर्ण झाले असून यावेळी आ.खोतकर यांनी शिवसेनेचे उपशहर प्रमुख शेख नजीर यांचे कौतुक केले.

यावेळी उपस्थित त्यांना संबोधित करताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे म्हणाले की, कब्रस्तान मध्ये आल्यानंतर हे कब्रस्तान आहे असं वाटतच नाही कारण येथे भरपूर वृक्षारोपण तसेच पाण्याची व्यवस्था करण्यात आल्यामुळे एखाद्या गार्डनमध्ये आल्यासारखे वाटत असल्याचे म्हणून त्यांनी शेख नजीर यांच्या कामाचे भरभरून कौतुक केले.

या कामासाठी शिवसेना उपशहर प्रमुख शेख नजीर भाई यांनी पुढाकार घेऊन पाठपुरावा करून संपुर्ण काम स्वतःच्या देखरेखेत केले. त्यासाठी आ.अर्जूनराव खोतकर यांच्या कडून विकास कामासाठी चाळीस लाखाचा निधी मंजूर करवून घेतला आणि काझी कब्रस्तानचा चेहरामोहरा बदलला. या ठिकाणी पाण्याची व्यवास्था, रस्ते, वेगवेगळे वृक्ष लागवड, जनाजा नमाज पठण साठी शेड ई. कामे करून शेख नजीर यांनी काझी कब्रस्तानला सुसज्ज बनवले.

## प्रदेशाध्यक्षपदी नव्या चेहऱ्यामुळे पृथ्वीराज चव्हाणांना आश्चर्य

**मुंबई -** हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे नेतृत्वाची धुरा सोपविल्यानंतर पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केले आश्चर्य. काँग्रेसने माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती केल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये चलबिचल सुरू असल्याचे म्हटले जात आहे. काँग्रेसमध्ये असलेल्या नेत्यांच्या तुलनेत अतिशय नवख्या नेत्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपविल्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. आश्चर्य व्यक्त केलेल्या नेत्यांमध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचाही समावेश आहे. पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह सतेज पाटील आणि विश्वजीत कदम यांच्यासारख्या तरूण काँग्रेस नेत्यांनाही हे स्वीकारणे कठीण असल्याचे कळते. विशेषतः नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. अशा या आव्हानात्मक टप्प्यावर काँग्रेस पक्षाला पुनरुज्जीवित करू शकेल, अशा आक्रमक नेत्याची निवड करायला हवी होती, असे अनेक नेत्यांचे म्हणणे आहे.

हर्षवर्धन सपकाळ २०१४ ते २०१९ पर्यंत बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. याव्यतिरिक्त सपकाळ राज्यात फारसे सक्रिय दिसले नव्हते. द इंडियन एक्सप्रेसशी बोलत असताना काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले, मागच्या पाच वर्षांत सपकाळ यांनी पक्षाची भूमिका मांडलेली ऐकिवात नाही. २०१९ नंतर अडीच वर्षांसाठी काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीत सत्तेत होता, यावेळीही सपकाळ कुठेच दिसले नाहीत. तसेच जेव्हा भाजपाने महाविकास आघाडीचे सरकार पाडले, तेव्हाही पक्षाचे मनोबल उंचावण्यासाठी सपकाळ पुढे आले नाहीत.

द इंडियन एक्सप्रेसशी बोलत असताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, पक्षाचे नेतृत्व करण्यासाठी काँग्रेसने माझ्याशी संपर्क साधला होता. पण तरूण नेत्याकडे ही जबाबदारी देण्यात यावी, असे मी सांगितले. पण जेव्हा हर्षवर्धन सपकाळ यांच्या नावाची घोषणा झाली, तेव्हा मलाही आश्चर्य वाटले. कारण त्यांचे नाव चर्चेतही नव्हते. मला वाटले होते, कोल्हापूरचे सतेज पाटील या पदावर येतील. आम्ही सतेज पाटील यांचे नाव पक्षश्रेष्ठींना कळवले होते. सतेज पाटील यांनी कदाचित प्रदेशाध्यक्षपदासाठी नकार दिला असावा.

पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले, सपकाळ यांना काँग्रेस पक्षाचे नेतृत्व करत असतानाच महाविकास आघाडीमधील पक्षांशी समन्वय ठेवावा लागणार आहे. यात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासारख्या मातब्बर नेत्यांचा समावेश आहे. जर प्रस्थापित नेत्यांनी हे पद घेण्यास नकार दिला असेल तर पक्षासमोर फारसा पर्याय उरलेला नाही. आमच्यासाठी आता हा विषय संपला आहे. सपकाळ पुढे कसे काम करतात, हे पाहू.

काँग्रेसचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष सतेज पाटील या निर्णयामुळे नाराज असल्याची चर्चा होती. पण त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाबाबत नाराजी असल्याची चर्चा फेटाळून लावली. ते म्हणाले, पक्षाने योग्य निर्णय घेतला आहे. सपकाळ हे उत्तम संघटक आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांना एकत्र बांधून पुढे नेण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य त्यांच्याकडे आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करून त्यांना भविष्यातील आव्हानांचा सामना करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. ते एक तटस्थ व्यक्ती असून त्यांच्यावर भूतकाळात कोणतेही आरोप झालेले नाहीत. त्यांचे व्यक्तिमत्व साधे असून त्यांनी जिल्हा परीषद अध्यक्ष आणि आमदार म्हणून काम केले आहे. तसेच ते सर्वांना उपलब्ध होतील. ते सकाळी ९ वाजता पक्ष कार्यालयात येतात आणि रात्रीपर्यंत सर्वांना भेट देतात.

सतेज पाटील पुढे म्हणाले की, त्यांना संबंध महाराष्ट्रातून नेते आणि कार्यकर्त्यांचे फोन येत आहेत. मी प्रदेशाध्यक्ष पद का घेतले नाही, अशी विचारणा पान २ वर

### युवा आदर्श

### झाकीर हुसैन ...

झाकीर हुसेन निधने
स्थिरावे गोड निनाद
आबालवृध्द कर्णास
लावला सुरांचा नाद
उस्फुर्त करे शब्दांस
अनाडीही देतो दाद
सवय लावली अधरा
बोलती वाह उस्ताद
शास्त्रोक्त पाश्चात्य सूर
फ्युजन ते मन मुराद
शालीनता व्यक्तीत्वां
पूरी करे रसिकमुराद
बांधता गिता स्वरांत
विहार करती आझाद
कैक अ विस्मरणीय
कलाकृती येती याद
दिग्गज सहन वोदिता
दिला साथ आस्वाद
बोटांत अद्भुत जादू
नाविन्या कुठे ददाद
कैक वाद्‌य्या लीलया
सहज साधती संवाद
असा दुजा होणे नसे
नोंद भिन्न निर्विवाद

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## दस्त नोंदणी कार्यालयाच्या रखडलेल्या इमारतीच्या बांधकामाचा मार्ग मोकळा

### जालना क्रेडाईचा न्यायालयीन लढा व यशस्वी पाठपुराव्याला यश

**जालना । प्रतिनिधी -** निधीअभावी आणि प्रशासकीय अनास्थेमुळे तब्बल आठ ते दहा वर्षांपासून रखडलेल्या जालना शहरातील सह निबंधक व सह दुय्यम निबंधक (दस्त नोंदणी) कार्यालयाच्या नव्या इमारतीच्या उर्वरित बांधकामाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. जालना क्रेडाईच्या पाठपुराव्यामुळे यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला असून, लवकरच नागरिकांना आधुनिक व सुविधायुक्त दस्त नोंदणी कार्यालय उपलब्ध होणार आहे.

सन २०१२-१३ मध्ये सह जिल्हा निबंधक कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ९२.८५ लाख तर दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग-२ जालना क्रमांक १ व ३ साठी ६८.०६ लाख रुपये मंजूर झाले होते. त्यापैकी अनुक्रमे ७२.६३ लाख व ५९.१२ लाख रुपये खर्च झाले. मात्र, काम सुरू होण्यास विलंब झाल्याने दरवाढ, जीएसटी (१८ जुलै २०२२ च्या शासन निर्णयानुसार १८%), इलेक्ट्रिकल वर्कसाठी आवश्यक १६.२३ लाख रुपये यामुळे ११५.५९ लाख रुपयांची अतिरिक्त गरज निर्माण झाली, आणि निधीअभावी काम ठप्प झाले. त्यामुळे गेल्या ८-१० वर्षांपासून ही इमारत अपूर्ण अवस्थेत पडून होती. स्टाईल्स, दरवाजे, खिडक्या तुटलेल्या अवस्थेत होत्या. सध्या हे कार्यालय जुन्या तहसील कार्यालयाच्या परिसरात त्याला कित्येक वर्षापासून कार्यरत आहे. मात्र, तिथे पाणी, शौचालय, बैठक व्यवस्था, प्रतीक्षालय यांसारख्या मूलभूत सुविधा नसल्यामुळे त्यामुळे नागरिक आणि कर्मचारी मोठ्या त्रासाला सामोरे जात आहेत.

जालना क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी ४ जुलै २०२४ रोजी ड.ओममाहेश्वरी जाधव आणि ड. महेश धन्नावत यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली. जालना जिल्ह्यात दस्त नोंदणीद्वारे शासनाला उद्दिष्टापेक्षा जास्त महसूल मिळत असताना, नागरिकांना मूलभूत सुविधा मिळू नयेत, यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच, जुन्या तहसील कार्यालयातील दस्त नोंदणी कार्यालयाची पान २ वर

## संतांनी दिलेला ठेवा जपण्याची गरज - हभप नारायण महाराज

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** संताने दिलेला ठेवा आज जपण्याची गरज आहे. असे प्रतिपादन ह .भ .प. नारायण महाराज पिंपळे (गुरुजी) यांनी काल श्रीक्षेत्र रुईखेड मायंबा तालुका. बुलढाणा जिल्हा. बुलढाणा या ठिकाणी श्री संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन रुपी सेवेमध्ये प्रतिपादन केले.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि या संतांच्या भूमीमध्ये थोर महात्मे थोर संत होऊन गेले. त्यांनी जपून ठेवलेला ठेवा. म्हणजेच ग्रंथ रुपी प्रसाद आपल्या सर्वांसाठी आहे. त्याचे जतन करणे त्याचबरोबर संतांनी सांगितलेल्या मार्गावर चालणे आजच्या काळाची गरज आहे. आज तरुणांना उपदेश पर अनेक अभंग श्री तुकोबाराय ,श्री नामदेवराय, श्रीनाथ महाराज यांनी लिहून ठेवलेले आहे. ते जपण्याची आणि त्याप्रमाणे मार्गक्रमण करण्याची आज गरज आहे. नव्हे नव्हे येणाऱ्या पिढीसाठी हाच वसा देण्याची आज गरज आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पान २ वर



### योगेश नगर येथे श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह

## ह.भ.प. भागवत महाराज काळबांडे यांचे कथा प्रवचन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील अंबड रोडवरील योगेश नगर येथे दि. १३ फेब्रुवारी २०२५ पासून श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह सुरु करण्यात आला आहे. ह.भ.प. भागवत महाराज काळबांडे हे रोज भक्तीमय वातावरणात कथा प्रवचन देत आहेत. या सप्ताहाची सांगता दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी होणार असून या दिवशी आमदार अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार सोहळा देखील होणार आहे अशी माहिती संस्थापकीय अध्यक्ष सुधाकर सोनार यांनी रविवार दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता दिली.

अशोक महाराज पाथ्रुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश नगर येथे श्री गजानन महाराज मंदीर संस्थानच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात दैनंदीत धार्मिक कार्यक्रम होत आहेत. यामध्ये दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री. ह.भ.प. म हंत महादेव महाराज गिरी यांचे किर्तन झाले. तर दि. १४ फेब्रुवारी रोजी श्री. ह.भ.प. एकनाथ महाराज जाधव यांचे, दि. १५ फेब्रुवारी रोजी श्री. ह.भ.प. अ‍ॅड. समाधान महाराज लोखंडे, दि. १६ फेब्रुवारी रोजी श्री. ह.भ.प. भागवत महाराज नखाते यांचे किर्तन झाले असून दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी ह.भ.प. कु. योगीताताई देवकर, दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी ह.भ.प. सौ. शारदाताई महाराज मापारी, दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी ह.भ.प. पंकज महाराज थोरे यांचे किर्तन होणार आहे. रोज दुपारी १ ते ५ वाजेपर्यत ह.भ.प. भागवत महाराज काळबांडे यांचे श्रीमद् भागवत कथा होत आहे. या श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहासाठी संस्थापकीय अध्यक्ष सुधाकर सोनार, इंजि. पद्माकर काटकर, अविनाश खांडेकर,चंद्रभान खांडेकर, विजय लोणकर, अ‍ॅड. म हादेव साखरे, अशोक पवळ, पद्माकर काकडे, हरीभाऊ गजर, रविंद्र राम



दासी, फकीरा वाघ हे परिश्रम घेत आहेत. या सप्ताहाची सांगता दि. २० फ ेब्रुवारी २०२५ रोजी होणार असून आम दार अर्जुनराव खोतकर यांचा त्याच दिवशी सत्कार सोहळा होणार असून या कार्यक्रमाला ह. भ. प. नानासाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# संपादकीय पान

## क्रांतिकारकांचे गुरू

स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांरांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मोबाईलचा अतिवापर आरोग्यास घातक - डॉ. प्रकाश आंबेकर

**मंठा । प्रतिनिधी** - मोबाईलचा अतिवापर आपल्या शारीरिक,सामाजिक व मानसिक आरोग्यास घातक ठरत असल्याचे डॉ. प्रकाश आंबेकर यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ जालना तर्फे शहरातील हॉटेल मधुबन सभागृहात आयोजित आरोग्य मित्र प्रशिक्षण कार्यशाळेत मोबाईलचा वापर व मानसिक आरोग्य या विषयावर ते बोलत होते. पुढे बोलताना आंबेकर म्हणाले की मोबाईलच्या अतिवापरामुळे मानसिक संतुलन बिघडणे,स्मरणशक्ती कमी होणे,चिडचिडपणा वाढणे,मूड बदलणे,डिप्रेशनकडे जाणे,

अपघात होण्याची शक्यता, कौटुंबिक आणि व्यावसायिक क्षेत्रात कलह निर्माण होणे सामाजिक संबंध बिघडणे असे प्रकार घडत आहेत. हे प्रकार रोखण्यासाठी वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे अन्यथा परिस्थिती हाताबाहेर गेल्या उपचार करूनही फायदा होत नाही. हे सर्व रोखण्यासाठी सोशल मीडियावर टायमर लावणे, दिवस सुरू होण्यापूर्वी आणि संपण्यापूर्वी फोन टाळने,

झोपण्याची तयारी करत असताना फोन चा वापर टाळणे,फोनचा ग्रेस्केल चालू करने,

दर काही मिनिटांनी फोन तपासण्याची सवय सोडून देणे इत्यादी त्यांनी सुचवले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त राजेंद्रजी राठी, सचिनजी पिपाडा, यशवंत बदनापूरकर डॉ. विठ्ठल राजकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भानुदास दोबाले यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.अमित हजारे यांनी केले. यावेळी शहरातील बारा वस्त्यातील व आठ गावातील १२६ आरोग्य मित्र महिला, विद्यार्थिनी, पुरुष उपस्थित होते.







**छ संभाजीनगर येथे इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या सातव्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन कार्यक्रमात वृत्तपत्राचे छायाचित्रकार मजहर सौदागर यांचा सत्कार करताना राष्ट्रीय अध्यक्ष सेराज अहमद कुरेशी, झारखंडचे प्रदेशाध्यक्ष देवेंद्र सिन्हा यांची यावेळी उपस्थिती होती.**

# डोळ्यांची काळजी घेण्यासाठी खा 'सुपरफूड'!

सध्या मोबाइल, लॅपटॉपवर काम करणारांची संख्या वाढत आहे. मुलेही पूर्ण वेळ टीव्ही किंवा कॉम्प्युटरपुढेच घालवतात. अशामध्ये डोळ्यांची दृष्टी कमजोर होणे सहाजिक आहे. काम तर तुम्ही बंद करु शकत नाही, परंतु डोळ्यांची योग्य काळजी घेणे तितकेच आवश्यक आहे. त्यासाठी काही वस्तूंचे सेवन करायला विसरु नका!

-हिरव्या पालेभाज्या, जसे पत्तागोबी, पालक यामध्ये ल्यूटिन आणि जीनैनथिन तत्वांचे प्रमाण अधिक असते. हे तत्व मोतीबिंदूसारख्या आजाराला दूर ठेवते. याशिवाय मटर, ब्रोकलीही



डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. पिस्ता, अक्रोट, बदाम यासारख्या मेव्यांचे सेवन करणे आवश्यक आहे, कारण यामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड असते. हे व्हिटामिन ईनेही परिपूर्ण असते. -नॉन व्हेज खाणाऱ्यांसाठी ही चांगली गोष्ट आहे की,त्यांनी माशांचे नियमित सेवन करावे, कारण यामध्ये ओमेगा ३ फैटी ॲसिड असते जे डोळ्यांना कोरडे पडू देत नाही आणि त्यामध्ये पाणी टिकवून ठेवते. ज्यामुळे डोळे खराब होत नाहीत. -लिंबू, संत्रा यांसारखे आंबट फळे खायला हवीत, कारण यामध्ये व्हिटामिन सी असते जे मोतीबिंदू होण्याची शक्यता कमी करते. -राजमा, लोबिया सारख्या भाज्यांचा आपल्या आहारात समावेश करावा. हे बायफ्लैवोनॉएड आणि जिंकने भरलेले असते, जे रेटिना म्हणजे डोळ्यांच्या मागच्या पडद्याला सुरक्षित ठेवते आणि मोतीबिंदू किंवा डोळे खराब होण्याचा धोका कमी करते. -अंड्यांमध्ये व्हिटामिन ए असते जे डोळ्यांची दृष्टी वाढविते. रात्री न दिसण्याची समस्याही दूर करते. त्यामुळे अंडे आवश्यक खावे. -सूर्यफूलांच्या बिया खाणे फायदेशीर असते. जे डोळ्यांना आजारांपासून वाचविते. यामध्ये व्हिटामिन ई आणि जिंक असते. -गाजर, टमाटर, स्ट्रॉबेरी, कद्दू, मक्का, लाल आणि पिवळी शिमला मिरची जसे रंगीबेरंगी फळे आणि भाज्या खाव्यात कारण यामध्ये व्हिटामिन ए आणि सी असते. ज्याचा डोळ्यांना चांगला फायदा होतो.

# सार्वजनिक ग्रंथालयांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार-आमदार अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी** - सध्या सार्वजनिक ग्रंथालयांना मिळणारे अनुदान हे अल्प असल्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे या समस्या सोडविण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असे प्रतिपादन ग्रंथालय भारती, जालना व संत सावता महाराज सार्वजनिक वाचनालय, हातडी यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण सभा,जालना येथे दिनांक-१६ फेब्रुवारी २०२५,रविवार रोजी आयोजित जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनच्या २७ व्या एक दिवसीय वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन व उत्कृष्ट ग्रंथालय,ग्रंथालयीन कार्यकर्ता,ग्रंथपाल पुरस्कार वितरण कार्यक्रमा प्रसंगी जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर ग्रंथालय भारतीचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. राजशेखर बालेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहायक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख भास्कर अंबेकर, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा तथा नगरसेविका संध्या देठे,छत्रपती संभाजीनगर येथील ग्रंथालय भारतीचे अध्यक्ष मनोज मुळे,औरंगाबाद जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर, ग्रंथालय भारतीचे सदस्य चंद्रकांत जोशी सनपूरकर,जालना येथील ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील लिपीक शंकर पवार,ग्रंथालय भारतीचे जालना जिल्हा उपाध्यक्ष रमेश देहडकर,ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगांवकर, अण्णा साहेब खंदारे माजी पंचायत समिती सदस्य यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन झाली. प्रास्ताविक डी.बी.देशपांडे यांनी दिली.

पुढे बोलताना अर्जुनराव खोतकर म्हणाले कि, अधिवेशानामध्ये संमत होणाऱ्या ठरावाची व निवेदनाची एक प्रत मला द्यावी त्यासोबत आपल्या ठरावप्रमाणे माझे पत्र जोडून संबंधित विभागाकडून त्याप्रमाणे शासनाकडून न्याय देण्याची भूमिका माझी राहिल. तसेच वर्ग बदल, नवीन शासन मान्यता ४० टक्के अनुदान वाढ तसेच सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी सेवाशर्ती लागू करणे असेल यासह इतर सर्व प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करील. आपण दिवसातील जास्त वेळ हा स्क्रीनमध्ये घालवतो तोच वेळ ग्रंथ वाचनामध्ये घालावा कारण आपण एकदा वाचन केले की वर्षानुवर्ष लक्षात राहते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना राजशेखर बालेकर म्हणाले कि, वर्ष २०१२-२०१३पासून नवीन ग्रंथालयांना मान्यता बंद, सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान वाढ नाही त्यातील कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती नाही यासह इतर मागण्या शासनाकडून मान्य करण्यासाठी आमदार महोदयांनी प्रयत्न करावे असे याप्रसंगी ते म्हणाले.

शंकरराव बालेकर स्मृति उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार बदनापूर येथील स्वामी विवेकानंद वाचनालय, भगवानराव देशपांडे स्मृति उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार मंठा येथील सम्राट अशोक वाचनालयाचे अध्यक्ष अरुण प्रधान, अण्णासाहेब चव्हाण स्मृति उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारी घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगांव येथील समर्थ सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल हिम्मत सोळंके यांना शाल,श्रीफळ,रोख रक्कम,स्मृति चिन्ह,सन्मानपत्र सन्मानपत्र आमदार खोतकर यांच्या हस्ते सन्मान पूर्वक प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी तर उपस्थितांचे आभार श्रीकांत काळे यांनी मानले. याप्रसंगी जयश्री कुलकर्णी, मनोहर कुलकर्णी, रत्नाकर नंद, संजय शिंदे, कांतराव डांगे, मुकुंदा खंदारे,प्रफुल्ल देशपांडे, प्रवीण देशपांडे,राजाराम चव्हाण, काशिनाथ



गायकवाड, सुखदेव उघडे, मधुकर गरड,नंदकुमार कुलकर्णी,श्यामसुंदर काळे,शैलेंद्र बदनापूरकर,सय्यद युनुस, विठ्ठल देठे, सखाराम बोरुळ, बद्रीप्रसाद सोनी, ओम आहेर,नितीन बावणे,सुधाकर भालेराव, मिलिंद सावंत,सुनिता काळे,प्रणिता कुलकर्णी,प्रतिभा देशपांडे,कल्पना देशपांडे,नम्रता कुलकर्णी,नीलिमा बालेकर,जया तोंदुळे, रेणुका गुल्लापेल्ली सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी,कर्मचारी,ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## प्रदेशाध्यक्षपदी नवा...

केली जात आहे. खरे सांगायचे तर चार वर्ष हे पद सांभाळणे माझ्यासाठी कठीण होते. मी फार फार तर दोन वर्ष पद सांभाळू शकलो असतो. त्यामुळे मी माघार घेतली. आज पक्षाचे पुनरुज्जीवन करणे, ही प्राथमिकता आहे. सपकाळ यांनी नवीन कार्यकर्त्यांना जोडण्यावर लक्ष केंद्रीत केले. तसेच जिल्ह्यांना भेटी देऊन पक्ष नेत्यांमधील मतभेद दूर केले तरी ते पक्षाला पुनरुज्जीवित करण्यात यशस्वी होतील.

सतेज पाटील यांनी यावेळी भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांचे उदाहरण दिले. ते म्हणाले, चंद्रकांत पाटील भाजपाचे प्रदेशाध्यक्ष असताना त्यांनी पक्ष उभारणीसाठी आपला वेळ दिला, शक्ती खर्च केली. पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांसाठी ते कायम उपलब्ध असत. त्यांच्याकडून कधी कधी वादग्रस्त विधाने झाली असतील पण जेव्हा जेव्हा पक्षासाठी लढण्याची वेळ आली तेव्हा तेव्हा ते आघाडीवर होते. मी त्यांना पक्ष कार्यकर्त्यांशी पहाटेपर्यंत संवाद साधताना पाहिले आहे. कधी कधी साधे वाटणारे नेतेही पक्षाला एक मोठी उंची गाठून देतात. त्यामुळेच सपकाळ काँग्रेसला पुन्हा यश मिळवून देतील, अशी आम्हाला आशा आहे.

सांगलीचे आमदार विश्वजीत कदम म्हणाले, सपकाळ यांच्या निवडीमुळे मी नाराज नाही. मुळात मी प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीतच नव्हतो. सपकाळ यांच्या निवडीचे कारण विचारले असता ते म्हणाले की, याचे कारण तुम्ही पक्षालाच विचारा.

काँग्रेसचे आणखी एक नेते सचिन सावंत म्हणाले की, सपकाळ हे अनेक वर्षांपासून पक्षात आहेत. ते एनएसयुआयचे अध्यक्षही होते. पक्षाने त्यांना पद देत असताना सर्व पैलूंचा नक्कीच विचार केला असेल. मला वाटते पक्षाच्या कार्यकर्त्याला नेतृत्व करण्याची संधी देऊन पक्षाने एक चांगला निर्णय घेतला आहे. तर प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले, पक्षाने योग्य निवड केली आहे. सपकाळ पक्षाचे निष्ठावंत नेते आहेत. त्यांच्याकडे उत्तम संघटन कौशल्य आहे. तसेच ते पंचायती राज संघटनेचे उपाध्यक्षदेखील आहेत.

## दस्तनोंदणी ...

दयनीय अवस्था, पावसाळ्यात होणारी गळती आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांकडे लक्ष वेधण्यात आले. रिट याचिका दाखल झाल्यानंतर प्रशासकीय स्तरावर तत्काळ हालचाली सुरू झाल्या. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ९९.३६ लाख रुपये मंजूर करण्यात आले. या निधीच्या मंजुरीमुळे रखडलेले बांधकाम लवकरच पूर्ण होईल. यामुळे नागरिकांना अत्याधुनिक, सुविधा युक्त आणि व्यवस्थित नियोजन असलेले दस्त नोंदणी कार्यालय लवकरच उपलब्ध होणार आहे. जालना क्रेडाईच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, न्यायालयीन लढ्यामुळे प्रशासनाला जाग येऊन निर्णय घ्यावा लागला. या निर्णयामुळे जालना शहरातील नागरिक, वकिल, बांधकाम व्यावसायिक, दस्तनोंदणीशी संबंधित असलेल्या सर्वांना मोठा दिलासा मिळणार आहे. यापुढे आधुनिक सुविधा असलेल्या नव्या इमारतीत दस्तनोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागणार नाही. जालना क्रेडाईने उचललेल्या पुढाकारामुळे प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली असून, लवकरच नव्या इमारतीत कार्यालय सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

## संतांनी दिलेला ...

श्री गजानन महाराज प्रकट दिनाचा उत्साह आनंदाने साजरा होत आहे. त्यामध्ये रूईखेड मायंबा या ठिकाणी अत्यंत उत्साहात आणि आनंददाई वातावरणात हा अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. यामध्ये हरिभक्त परायण वैभव महाराज सोनवणे ह.भ. प. विठ्ठल महाराज शिंदे, ह भ प विष्णु महाराज वरवंड, ह भ प वाघ महाराज, ह भ प दुनगहू महाराज, व तरुणांनी पुढाकार घेऊन या सप्ताहाचे आयोजन केलेले आहे.

# उखळी तांडा येथील शाळेत संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी** - जालना तालुक्यातील उखळी तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे राष्ट्रसंत सेवालाल महाराज जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी पालक,ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य, सहशिक्षक नारायण माहोरे व गणेश जाधव उपस्थित होते.

# मातृपितृ दिन पूजन सोहळा साजरा

**भांडुप । प्रतिनिधी -** राजाराम शेठ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सिद्धिविनायक इंग्लिश मिडियम स्कूल येथे नुकताच मातृपितृ दिन पूजन साजरा करण्यात आला.

भांडुप पश्चिम येथील सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजाराम शेठ विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय ,इंग्लिश मिडियम स्कूल यांच्या संयुक्तपणे विद्यार्थांमध्ये आपल्या आई-वडिलांबद्दल आदर ,प्रेम वाढवण्याच्या उद्देशाने शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रश्मी खानविलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी माता पिता पूजन दिन साजरा केला .



अत्याअधुनिक युगात वावरताना आपल्या अवतीभोवती मोबाईलच्या दुनियेत जगताना विद्यार्थ्यांमध्ये आपल्या आई वडिलां बद्दलचा सन्मान ,आदर याची कुठेतरी दिवसेंदिवस कमतरता होत चालली आहे. खरं तर परमेश्वराची भक्ती व सेवा सर्व ठिकाणी ऐकतो बोलतो पण माता-पितां चे पूजन करणे व त्यांचा आदर , त्यांच्याबद्दलचे प्रेम मनात जपून ते वाढवणे हीच ईश्वर सेवा असते. हे विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवण्यासाठी शाळेने हा उपक्रम सुरू केला आहे.

विशेष म्हणजे सर्वच पालक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होते .या अनोख्या माता पिता पूजन उपक्रमाची सर्व समाजातील लोकांकडून कौतुक करण्यात आले.

# लुटमार करणाऱ्या टोळीला पोलीसांनी ठोकल्या बेड्या

## तीन आरोपी ताब्यात; चंदनझीरा पोलीसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** शाळेचा विद्यार्थी सागर पंढरीनाथ शिदे रा. रुपनगर अंबड चौफुली जवळ जालना हा संध्याकाळी ०७.३० वा सुमारास मोतीबाग तलाव येथे फिरण्यासाठी गेला असता अज्ञात तिन आरोपीतांनी त्यास मारहाण करुन त्याचे जवळील १५,०००/- रुपये किमतीचा वन प्लस लाईट मोबाईल फोन जबरीने हिस्कावुन घेवुन गेला होता. त्या बाबात सागर शिदे याचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुन्हा दाखल आहे.

तसेच दि.११/०२/२०२५ रोजी विद्यार्थी रुषभ प्रविण घोंगडे, रा. योगेशनगर अंबड रोड जालना हा दुपारी ०४.३० वा सुमारास नागेवाडी कॉलेज येथे घरी परत जात असतांना अज्ञात तिन आरोपीतांनी स्कुटीवर पाठीमागुन येवुन सदर विद्यार्थ्यास मारहाण करुन त्याचे जवळील १५.०००/- रुपये किंमतीचा रेडमी नोट कंपनीचा मोबाईल जबरीने हिस्कावुन नेला होता. सदर बाबत रुषभ घोंगडे याचे तक्रारी वरुन पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे गुन्हा दाखल आहे.

दोन्ही गुन्ह्याचे प्रो. पोलीस उप अधीक्षक करिश्मा चौधरी यांनी दखल घेवुन सदर गुन्हे उघडकीस आनने कामी विषेश पथकाची स्थापना करुन सदर पथकाने दोन्ही गुन्ह्याचा छडा लावत सदर गुन्ह्यात आरोपी १) रोहीत संतोष जाधव रा. डबलजीन जालना २) यशराज उर्फ सोनु मुकुंददास वैष्णव रा. दहेडकरवाडी ३) अजिंक्य काकासाहेब साखरे रा. माळीपुरा जालना यांच्या मुसक्या आवळल्या असुन शाळेच्या विद्यार्थायांना वरील



गुन्हे केल्याची कबुली दिली असुन गुन्ह्यात चोरलेला एकुण ३०,०००/- रुपय किंमतीचे दोन मोबाईल फोन व गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी वाहणे किंमती ७०,०००/- रुपयाचे जप्त करण्यात आले आहे. गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपीतांकडुन अजुनही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याची माहिती आज दिनांक १५ शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास प्रसिद्धीपत्रद्वारे दिली

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल साहेब,अपर पोलीस अधिक्षक अयुष नोपाणी साहेब, मा. उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकणी साहेब यांचे मागदर्शनाखाली प्रो.डि.वाय. एस.पी. करिश्मा चौधरी मॅडम, पोउपनि एम. बी स्कॉट, सहा. पोउपर्पान मनसुब वेताळ, हुसेन अफसर, पोलीस हवालदार प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, संतोष वनवे, साई पवार, सागर खैरे, नवनाथ पाटील, यांनी सदरची कारवाई केली आहे.

# बारावी पेपर तपासणीवर अंशतः अनुदानित शिक्षकांचा बहिष्कार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** महाराष्ट्र अंशतः अनुदानित शिक्षकांनी बोर्ड कामकाजावर तसेच पेपर तपासणीवर बहिष्कार टाकला आहे. २०२४ मध्ये मंजूर केलेली २० टक्के टप्पा वाढ देण्यात यावी, अशी मागणी या शिक्षकांच्यावतीने करण्यात आली आहे. या संदर्भात अंशतः अनुदानित शिक्षकांनी शिक्षण विभागास निवेदन सादर केले आहे. शासनाने दि.१० ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील अंशतः अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना वाढीव २० टक्के वेतन अनुदान देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. यासाठी सुमारे ११०० कोटी रुपये खर्ची टाकण्याला मंजुरी देण्यात आली होती. या संबंधीचा शासन निर्णय १४ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला होता. पण, शासन निर्णय निर्गमित होऊन ४ महिने उलटले तरी यासंबंधीची कोणतीही कार्यवाही न झाल्याने अंशतः अनुदानित शिक्षकवर्गात उदासीनता आहे.

गत हिवाळी अधिवेशनात तरतूद होऊन लाभार्थींना वाढीव २०% वेतन सुरू होणे खर तर अपेक्षित होते. परंतु, तसे झाले नाही. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १० ऑक्टोबर २०२४ च्या बैठकीत मंजुरी देण्यात आलेल्या ११०० कोटी इतक्या निधीची तरतूद व्हावी, यासाठी महाराष्ट्रातील तमाम अंशतः अनुदानित शिक्षकांनी बोर्डाच्या पेपर तपासणी कामावर बहिष्कार टाकला आहे. शासकीय यंत्रणेकडून शासन निर्णयाच्या अंमलबजावणीत झालेली कसूर यामुळे अंशतः अनुदानित शिक्षकांना लाभ मिळण्यास विलंब होत आहे. अंशतः अनुदानित शिक्षकांचा



प्रश्न अल्पावधीत न सुटल्यास शाळा कॉलेजकडे उत्तरपत्रिकांचे गठे पडून राहण्याची चिन्ह आहेत. शिवाय निकाल लांबणीवर पडू शकतो. पावसाळी अधिवेशनात तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी अंशतः अनुदानित शिक्षकांना जून २०२४ पासून टप्पा वाढ दिली जाईलअशी घोषणा केली होती. असे असताना जाणीवपूर्वक या निर्णयाकडे दुर्लक्ष केले जात आहे. शासनाने अंत पाहू नये, अशी मागणी अंशतः अनुदानित शिक्षकांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीतर्फे हे आंदोलन करण्यात येत आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यास एच.एस.सी पाठोपाठ एस.एस. सीच्या बोर्डपेपर तापसणीवर देखील बहिष्कारटाकला जाईल असा इशारा उच्च माध्यमिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. रमेश शेळके यांच्यासह प्राचार्य विलास नवले, बी. डी. कोल्हे, ए. पी. सपाटे, एन. डी. वायाळ, के.ए. चिचोले, एस. ए. पवार, वाय. बी. बकाल, डि.एस. काकडे, एस.ए. सोनोने, ए.पी. म्हस्के यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जालना कृषी उत्पन्न बाजार समितीतील २५ गाळे धारकांनी केला थकीत कराचा भरणा



**जालना । प्रतिनिधी -** कृषी उत्पन्न बाजार समितीतील २५ गाळेधारकांनी आपल्या थकीत कराचा भरणा केलाय. २५ गाळे धारकांकडून जालना महानगर पालिकेने ७ लाख ५० हजार रुपयांचा थकीत कर वसूल केलाय. २०१८ पासून कराची थकबाकी असलेल्या जालना कृषी उत्पन्न बाजार समितीतील सुमारे २५ गाळेधारकांना जालना महानगर पालिकेकडून मालमत्ता जप्तीच्या नोटीसा देण्यात आल्या होत्या. या नोटीसा प्राप्त झाल्याने २५ थकबाकीदारांनी आपल्या थकीत कराचा भरणा जालना महापालिकेला केलाय. या कर वसुली मोहिमेत जालना महानगर पालिकेच्या पथकाने सन २०१८ पासून थकबाकी असलेला ७ लाख ५० हजार रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला.

# अंबड शहरात अनैतिक संबधातून निर्घृण खून

## पोलिसांनी एका आरोपीच्या मुसक्या आवळल्या; ३ आरोपी फरार

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात खुनाचे सत्र सुरूच आहे. पोलिसाचा धाक अजिबात राहिलेला नाहीये. जालन्यात चाकूने वार करून एकाचा खून केल्याची घटना जालन्यातील अंबडमध्ये घडलीय. अनैतिक संबंधातून हा खून झाल्याची माहिती समोर आलीय. १५ फेब्रुवारी रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास अंबड शहरातील पठाण मोहल्लातील लाहोटी यांच्या घरासमोर हा खून करण्यात आलाय. मयत कलीम शेख खाजा शेख हा रक्त बंबाळ अवस्थेत स्वतःचा बचाव करण्यासाठी पळत असताना अंबड पोलीस स्टेशनच्या गेट समोरं कोसळला. नातेवाईकाच्या मदतीने पोलिसांनी जखमी कलीम याला जालन्यातील घाटी हॉस्पिटल मध्ये हलवले. मयत कलीम शेख खाजा शेख आणि आरोपी नासेर याच्या पत्नीच्या प्रेम सबंधाच्या कारणावरुन आरोपीने संगणमत करुन कलीम शेख खाजा शेख याचे तोंडावर, छातीवर, उजव्या हातावर चाकुचे वार करुन गंभीर जखमी करुन खून केलाय. आरोपी १) सर्फराझ फेरोज शेख, २) फेरोज ईस्माइल शेख, ३) आवेस फेरोज शेख, ईस्माइल शेख , ४.) नासेर आरोपीचे नाव आहे. सर्व आरोपी हे अंबड शहरातील पठाण मोहल्ला येथील रहीवाशी आहे. मयताचा भाऊ सलीम शेख खाजा शेख यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलिसांत गुन्हा दाखल केलाय. अंबड पोलिसांनी सरफराज फेरोज शेख या आरोपीला अटक केली असून अंबड पोलीस फरारी आरोपीचा शोध घेता येत.

या घटनेनं अंबड शहरात एकच खळबळ उडाली असून मयत कलिम शेख याचा मृतदेह रात्री ऊशिरा जालना जिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला होता. आज दिनांक १६ रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास जालना येथील



शासकीय सामान्य रुग्णालयात डाक्टरानी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यान, याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. तर फरार असलेल्या ३ आरोपींचा पोलिसांकडून शोध घेतला जातो.



**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वरफळ (ता.परतुर) येथील माँ. बागेश्वरी साखर कारखान्यास सदिच्छा भेट देत त्याठिकाणी तांत्रिकदृष्ट्या चालणाऱ्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव, कार्यकारी संचालक अजय जाधव आदींची उपस्थिती होती.**

# स्पेअर पार्टचे दुकान आगीत जळून खाक

## साईनाथ मंदिर परिसरातील घटना

**परतूर । प्रतिनिधी -** शहरातील परतूर वाटूर रोडवरील साईनाथ मंदिर परिसरातील न्यु माऊली ऑटो पार्ट व गॅरेज या दुकानाला रविवारी रात्री दोन च्या सुमारास आग लागून आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाल्याची घटना घडली. आगीत जवळपास २० लाखाच्या वर नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. सतीष बाबुराव सस्ते वय ३५ रा.खांडवी वाडी येथील या सुशिक्षित बेरोजगार युवकांने आठ वर्षांपूर्वी माऊली गॅरेज व ऑटोमोबाइल्स हे दुकान सुरू केले होते. यासाठी १५ लाखाचे कर्ज ही काढले होते. सर्व व्यवस्थित असताना रविवारी रात्री दोन वाजता या दुकानाला आग लागून संपुर्ण दुकान आगीत जाळून खाक झाल्याने सस्ते यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे. साईनाथ मंदिर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या गजबजलेल्या भागात हे दुकान असून तेथील पोलिस चौकी पासून २०० फुटावर आहे. शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या घटनेने अत्यंत कठीण परिस्थितीतून युवकाने उभ्या केलेल्या व्यवसायाची राख रांगोळी झालेली आहे . आगीची माहिती परतूर अग्निशमन दलाला दिल्यानंतर गाडी घटनास्थळी पोहोचली पण तो पर्यंत दुकान आगीत जळून खाक झाले होते. दरम्यान अग्निशमन गाडीच्या अनेक त्रुटीही या निमित्ताने समोर आल्या.



# हिस्वन खुर्द येथे सोलार वायर आणि पाण्याची मोटार चोरांचा सुळसुळाट

## चोरट्यांचा बंदोबस्त लावण्याची शेतकऱ्यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील हिस्वन खुर्द येथे सोलार वायर आणि पाण्याची मोटार चोरांचा सुळसुळाट पाहायला मिळत आहे. जालना तालुक्यातील हिस्वन खुर्द येथील सुमारे १२ शेतकऱ्यांचे शेतातील विविध साहित्य चोरीला गेले.




या मध्ये सोलार केबल वायर व ५ आणि ३ एच.पी. च्या एकूण ५ पाण्याच्या मोटार देखील चोरीला गेल्या आहेत. दिनांक १५ शनिवार रोजी शेतातून रात्रीच्या वेळी संशयास्पद अवस्थेत जाणारे काही इसम सीसीटीव्ही कॅमेऱ्यात देखील कैद झालेत. दरम्यान, शेतातील साहित्य चोरी करणाऱ्यांच्या पोलिसांनी मुसक्या आवळाव्यात अशी मागणी हिस्वन येथील शेतकऱ्यांनी तालुका जालना पोलिसांना निवेदनाद्वारे केली.

# ॲड. दिपक नाईक यांची राष्ट्रवादी शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण यांच्या हस्ते आज ॲड.दिपक छाया बलवंत नाईक यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जालना शहर जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती आज जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयात करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अन्वरबेग, युवक राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष आकाश श्रीरामवार, इम्रान मणियार, मानेगाव सरपंच संतोष ढेंगळे, ओबीसी विभाग प्रदेश सरचिटणीस अब्दुल हाफिज कुरेशी यांची उपस्थिती होती.

# जाफराबाद येथे रक्तदान शिबिराला प्रचंड प्रतिसाद

## राजर्षी शाहू परिवार व वन मिशन बुलढाणा ग्रुपचा स्तुत्य उपक्रम



**जाफराबाद । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष संदीप शेळके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत राजर्षी शाहू परिवार, वन मिशन बुलढाणा ग्रुपच्या संकल्पनेतून ४ फेब्रुवारी ते १३ मार्च २०२५ या कालावधीत हा उपक्रम राबवण्याचा संकल्प केलेला आहे. त्या अनुषंगाने १५ फेब्रुवारी रोजी जाफराबाद येथील शाखेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

आपण समाजाचे काहीतरी देणे लागत आहोत, या भावनेतून 'निरोगी समाजाचे स्वप्न साकारूया, रक्तदानासारखा उपक्रम राबवूया' 'दानात दान, रक्त दान' ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवत अन्य कार्यक्रम राबवण्यापेक्षा रक्तदानासारखे उपक्रम राबवलेले कधीही चांगले आहे, असे राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष संदीप शेळके यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे विभागीय व्यवस्थापक किरण बोर्डे, शाखाधिकारी किरण कासोद, अमोल पवार, गणेश तायडे यांच्यासह तालुक्यातील सर्वच मान्यवर, स्थानिक सल्लागार व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. जाफराबाद येथील महाराणा प्रताप चौकातील राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेच्या शाखेत स्वामी समर्थ रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान करण्यासाठी एकूण ४७रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी रक्तदान करणाऱ्या व्यक्तीच्या नावे १ लाख रुपयांचा वर्षासाठी मोफत अपघाती विमा काढण्यात येणार आहे, असे राजर्षी शाहू परिवार व वन बुलढाणा मिशन बुलढाणा ग्रुपच्या वतीने सांगण्यात आले.

# अल्पवयीन मुलीस पळवुन नेणार आरोपी गुजरात राज्यातुन अटक

**टेंभुर्णी -** अल्पवयीन मुलीस पळवून नेणाऱ्या गुन्हयातील आरोपी रवि कमल चव्हाण वय १९ वर्ष रा वलसाड गुजरात धमकावुन गुजरात राज्यात पळवुन नेवुन तिचेवर जबरदस्ती लैंगीक अत्याचार केलेबाबतचे तक्रारवरुन पोलीस ठाणेस गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयातील आरोपी शोधकामी यापुर्वी पथक पाठविले असता सदर आरोपी पोलीसांची नजर चुकवुन फरार झाला होता. त्यामुळे वारंवार शोध घेतला असता मिळुन आला नाही. परंतु तांत्रीक विश्लेषणातुन माहीती घेवुन तो गुजरात येथे हल्दी पिलीया, उंबरगाव, वलसाड येथे असल्याची माहीती मिळाल्याने तपास पथक गुजरात राज्यात पाठवुन स्थानिक पोलीसांची मदतीने सदर आरोपीस जेरबंद केले आहे. सदर आरोपी सद्या न्यायालयीन कोठडीत असुन पुढील तपास सपोनि खामगळ करीत आहेत.

# आ. दानवे यांच्या सतर्कतेमुळे अपघातग्रस्तास जीवनदान!

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** खासगांव-खापरखेडा या मुख्य रस्त्यावर ट्रॅक्टर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर रस्त्याच्या खाली जाऊन उलटल्याची घटना - शनिवारी घडली. या अपघातात चालक हा - स्टेअरींगमध्ये अडकला होता. तेव्हा रस्त्यावरुन जात असताना सदरील घटना आ.संतोष पा. दानवे यांच्या निर्देशनास आली. आ. दानवे यांनी लगेच गाडी थांबून आपल्या अंगरक्षक व भाजपा पदाधिकाऱ्यांच्या मदतीने चालकास बाहेर काढुन तात्काळ दवाखान्यात हलविण्यात आले आहे. आ. दानवे यांच्या सतर्कतेमुळे अपघातग्रस्त चालकाला जीवनदान मिळाले आहे. आ. दानवे हे जि.प.सदस्य संतोष पा. लोखंडे, चेअरमन सुधीर पाटील, यांच्या समावेत सवासणी येथील सरपंच सतीश गाडेकर यांच्यासह कुटुंबाचे सांत्वनपर भेट घेऊन जाफ्राबादकडे येत होते. त्यातच खासगांव ते खापरखेडा या रस्त्याचे काम सुरु आहे. खासगांवकडे जाणाऱ्या ट्रॅक्टरवरील चालकाचे नियत्रंण सुटल्याने ट्रॅक्टर रस्त्याच्या खाली जावून पलटी झाला. चालक हा स्टेअरींग खाली अकडला. तेव्हा आजूबाजूच्या शेतकरी व महिलांनी आरडाओरडा केला. हा प्रकार लक्षात येताच आ. दानवे यांनी चालकास गाडी थांबविण्यास सांगितले. आ. दानवे यांनी स्वतः गाडीखाली उतरुन सहकाऱ्यांच्या मदतीने चालकास बाहेर काढले. त्यानंतर त्यास तातडीने रुग्णालयात पाठवले.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.